## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.06.2025** **वार- सोमवार**

---

**भारतगौरवट्रेन**

राज्यात आज तिथीने शिवराज्याभिषेक दिन साजरा होत आहे. यानिमित्त आज रायगडासह पुणे जिल्ह्यातील विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांनी गर्दी केली आहे. या निमित्तानं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी "छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वे" देखील आजपासून सुरू झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून हिरवा झेंडा दाखवून रेल्वेला रवाना केलं. IRCTC, रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकारनं एकत्रितपणे याचं नियोजन केलं आहे. पाच दिवसांच्या या प्रवासात रायगड, शिवनेरी, प्रतापगड, पन्हाळा, लाल महाल, कसबा गणपती आणि शिवसृष्टी या ठिकाणांना ही रेल्वे भेट देणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वारशाचा जागर करणाऱ्या या गौरवशाली यात्रेचा अनुभव प्रवाशांसाठी प्रेरणादायी असेल असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**राजठाकरे**

मध्य रेल्वेच्या ठाण्याजवळच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून आज चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज

ठाकरे यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मुंबईत येणाऱ्या परप्रांतीय लोंढ्यांमुळे रेल्वेचा बोजवारा उडाला असल्याची टीका त्यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना केली. मूलभूत सेवा सुविधांच्या बाबतीत सगळ्याच शहरांमध्ये कमालीचा गोंधळ आहे; रेल्वेचं वेगळं महामंडळ करण्याबाबत फक्त चर्चा करण्यापेक्षा कृती करणं आवश्यक आहे, असं ठाकरे म्हणाले. रेल्वे अपघात कमी करण्यासाठी, बंद दाराच्या लोकल आणता येतील का? याचा विचार होणं गरजेचं आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.

**अजितपवार**

ऊसाच्या पिकाच्या उत्पादनाकरता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये कर्ज देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी  आज केली. पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिटय़ूट इथं ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, या विषयावर आयोजित चर्चासत्रात अजित पवार बोलत होते. ज्येष्ठ नेते शरद पवार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. ऊस पिकाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी हेक्टरी २५ हजार रुपये देणार असून हे पीक ठिबक सिंचनावर घेण्यात येत असेल तर त्यासाठी हेक्टरी १० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं अजित पवार म्हणाले.

**निवडणूक**

पुणे महापालिका प्रशासनाने आगामी महापालिका निवडणुकांसाठी  नियोजनाला सुरुवात केली आहे. चार सदस्यांचा प्रभाग, नव्याने समाविष्ट झालेली गावं, तसंच प्रत्येक केंद्रावर ७०० ते ८०० मतदार असल्याने, या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या दीडपटीने वाढणार आहे. त्यामुळे या केंद्रांसाठी जागा शोधण्याच्या सूचना सर्व परिमंडळ उपायुक्त आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी या संदर्भात बैठक घेतली.

**पावसाळामनपा**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य गंभीर परिस्थितीला सामोरं जाण्यासाठी पुणे महापालिका सज्ज झाली असून शीघ्र कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये क्षेत्रीय कार्यालय, पथ विभाग, मलनिस्सारण विभागासह इतर विभाग यांच्यात योग्य समन्वय राखून 15 क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काम चालणार आहे.

**<u>हरितसेतू</u>**

पिंपरी चिंचवड महापालिका अनेक नागरी विकास उपक्रम राबवत आहे.  या उपक्रमांचा एक भाग म्हणून हरित सेतू प्रकल्पाअंतर्गत एक स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. पादचारीकेंद्रित रस्ते, सुसंगत वाहनतळ व्यवस्था, मजबूत सार्वजनिक वाहतूक प्रणाली आणि सुरक्षित चौक अशा विविध विषयांवर आधारित या स्पर्धेची संकल्पना आहे. या स्पर्धेसाठीची नोंदणी आजपासून सुरू होत आहे. आणि 27 जून ही अंतिम मुदत आहे.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत मालमत्ता कर संकलन सुरू आहे. आतापर्यंत ३२ हजार ५०० थकबाकीदार मालमत्ताधारकांना नोटीस देण्यात आली असून त्यांनी थकबाकीसह चालू आर्थिक वर्षाचा कर तात्काळ भरावा, असं आवाहन महापालिकेचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केलं आहे.

**<u>क्रीडा</u>**

१८ वर्षांखालील गटाची राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा येत्या १४ ते १८ जून या कालावधीत पुण्यातील म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात होणार आहे. या स्पर्धेत विविध

जिल्ह्यातील 31 संघ सहभागी होणार आहेत. यातून निवडलेला संघ हरिद्वार इथं होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करेल.

**टेबलटेनिस**

पुण्यात सुरू असलेल्या जिल्हास्तरीय सांघिक टेबल टेनिस स्पर्धेत पीवायसी 'अ' संघाने सतरा वर्षांखालील गटात विजेतेपदावर नाव कोरलं. तर पीवायसी 'ब' संघ उपविजेतेपदाचा मानकरी ठरला. ईशान खांडेकर, श्रेयस माणकेश्वर, पुष्कर चक्रदेव हे विजयाचे शिल्पकार ठरले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 32 आणि किमान 23 पूर्णांक 8  दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**